**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २९/२०१९ मध्ये निशाण ४७ वरील आदेश.</u>**

अर्जाचे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज निशाण १ येथे दुरूस्ती करण्यासाठी *दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर ६ नियम १७* प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाण ४३ येथे आपली कैफियत दिलेली असून त्यांनी परिच्छेद क्र. ६ मध्ये गाव मौजे लांजा येथील गट क्र. २३४०/१, २३३०, २३११ या मिळकती रे. मु. नं. १/२००४ चे दाव्याचे निकालाने प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांना आलेल्या असल्याचे कथन केलेले आहे. वर नमूद मिळकतीमध्ये रे. मु. नं. १/२००४ मधील आदेशाप्रमाणे प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा आहे. त्यामुळे सदरच्या मिळकती या प्रस्तुतचे दाव्याकामी दावा मिळकत अ.क्र. अ मध्ये समाविष्ट करणे भाग झाले असल्याने सदर दाव्यामध्ये अ मिळकती मध्ये 'अ' चे अखेरीस अर्जात नमूद प्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी सदर अर्जाद्वारे मागितलेली आहे.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दिलेले असून त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादीला दावा मिळकतीबाबत दावा होवून त्याचा आलेला आदेश झाला असलेबाबत माहिती नाही. तसेच सदर मिळकतीबाबत यापूर्वी वाटप झाले असल्यास त्या मिळकती सदर दाव्यात समाविष्ट करता येणार नाहीत अन्यथा Res Judicta या तत्त्वाची बाधा येईल त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. परंतू अर्ज मान्य करावयाचा झाल्यास जास्ती जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली.

०४. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दुरूस्तीचे स्वरूप पाहता व त्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसते की, सदरच्या दुरुस्तीमूळे दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. वर नमूद चर्चेअंती प्रस्तुत दाव्यातील सर्व मागणी वजा कथने (Claims) एकाच कामकाजामध्ये होण्यासाठी व 'multiplicity of proceedings' टाळण्यासाठी मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रू. ५००/– इतकी कॉस्ट सरकार जमा करणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मागितलेली प्रस्तावित दुरूस्ती या आदेशापासून १४ दिवसांचे आत दाव्याकामी वर नमूद कॉस्ट भरून करून घ्यावी.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2025.09.20 17:38:41 +0530

**दिनांक :१९/०९/२०२५** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण–लांजा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**लांजा,जि.रत्नागिरी**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 19/09/2025 |
| Order Signed by P.O. on | :- | 19/09/2025 |
| Order uploaded on | :- | 22/09/2025 |